वि.दि.दावा क्र. १०/२०१७, नि.क्र. १०७ खाली

**वादीतर्फे साक्षीदार क्र. २ पंकज भागवत बावनकुळे**

**<u>सरतपास वादी तर्फे श्री ठोंबरे वकील साहेब यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u>**

१. प्रकरणात मी पुराव्याचे शपथपत्र सादर केलेले आहे. आता मला ते शपथपत्र दाखवले त्यावर माझी सही आहे. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे.

२. आता मला नि. क्र. ३६ वरील दि. २५/११/२०१३ रोजीच्या मुळ करारनाम्याची प्रत दाखविण्यात आली. त्यावर साक्षीदार क्र. २ म्हणून माझी सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून अमीत जैस्वाल यांची सही आहे. तसेच त्यावर वादी व प्रतिवादी यांच्या सह्या आहेत. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. हा दस्त माझ्या समक्ष झालेला आहे. सदर दस्त नोटरी करण्यात आला. त्यावेळी ही वरील सर्व लोक हजर होते.

३. आता मला नि. क्र. ३७ वरील दि. २०/१२/२०१३ रोजीच्या मुळ करारनाम्याची प्रत दाखविण्यात आली. त्यावर साक्षीदार क्र. १ म्हणून माझी सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून अंधारे यांची सही आहे. तसेच त्यावर वादी व प्रतिवादी यांच्या सह्या आहेत. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. हा दस्त माझ्या समक्ष झालेला आहे.

४. आता मला नि. क्र. ३८ वरील दि. २६/०३/२०१४ रोजीच्या मुळ करारनाम्याची प्रत दाखविण्यात आली. त्यावर साक्षीदार क्र. १ म्हणून माझी सही आहे. त्यावर साक्षीदार म्हणून अंधारे यांची सही आहे. तसेच त्यावर वादी व प्रतिवादी यांच्या सह्या आहेत. त्यातील सर्व मजकूर खरा व बरोबर आहे. हा दस्त माझ्या समक्ष झालेला आहे.

**<u>उलटतपास प्रतिवादी तर्फे श्री. सोनक यांच्या मार्फत सुरुः-</u>**

५. वादी केशव माझे मामा आहेत. त्यांनी मला नागपूर येथील दत्तात्रय नगर येथील घरी बोलावले होते. ती तारीख २३ नोव्हेंबर होती. त्यावेळी त्यांनी मला ठरलेल्या व्यवहाराबाबत सांगितले

व दि. २५ तारखेला आधार कार्ड सोबत घेउन येण्यास सांगितले. २५ तारखेला मी थेट नोटरी यांच्याकडे गेलो. घरी गेलो नाही. नोटरीचे नाव आठवत नाही. नोटरी यांच्याकडे जाण्याआधी मी प्रतिवादी यांना भेटलो नव्हतो. मी त्यावेळी त्यांना ओळखत नव्हतो. करारनाम्यावर प्रतिवादी यांनी अगोदर सही केली व त्यानंतर मी त्यावर सही केली. भाउजी जितेन्द्र यांनी मला सांगितले होते की, ते इसम प्रतिवादी आहेत. जितेन्द्र रघुते त्यावेळी हजर होते. त्यादिवशी मी करारनाम्या व्यतिरीक्त इतर कोठेही सही केली नव्हती. आम्ही सर्वांनी सह्र्या केल्या त्यावेळी नोटरी हजर होते. करारनाम्या व्यतिरीक्त वादी व प्रतिवादी यांनी आणखी कोठे सह्र्या केल्या होत्या हे मला माहित नाही. मी स्वतःहा शेती पाहिली होती. शेतीची चतुरसिमा मला सांगता येणार नाही. मी किती तारखेला शेती पाहीली ती तारीख सांगता येणार नाही. करारनाम्या मध्ये शेतीचे वर्णन चुकीचे लिहीले आहे, याबाबत मला सांगता येणार नाही. हे खोटे आहे की, वादीने प्रतिवादीला ५ लाख रूपये दिले असे मी खोटे सांगत आहे. प्रतिवादी ने पुन्हा वादीकडुन २ लाख नगदी मांगितले, हे मला भाउजी जितेंद्र यांनी सांगितले होते. त्यानंतर पुन्हा मला दि. २०/१२/२०१३ व २६/०३/२०१४ रोजी नोटरी यांच्या कडे सही करण्यासाठी बोलावण्यात आले होते. दोन्ही वेळेस मला सकाळी ११ ते १२ च्या दरम्यान बोलावण्यात आले होते. त्या दोन्ही वेळेस त्या करारनाम्यातील मजकुर नोटरी यांनी आम्हाला वाचून दाखवला होता. हे खोटे आहे की, दि. २५/११/२०१३, २०/१२/२०१३ व २६/०३/२०१४ रोजी मी नागपूर येथे नोटरी यांच्या कार्यालयात गेलो नव्हतो व प्रतिवारी शिवकुमार यांनी माझ्यासमोर सह्र्या केल्या नव्हत्या.

६. माझे शपथपत्रात काही ठिकाणी करारनाम्याची तारीख २४/११/२०१३ अशी नमुद करण्यात आलेली आहे ती टायपिंग मिस्टेक आहे. करारनाम्यावर आमच्या सह्र्या झाल्यानंतर नोटरी यांनी त्यावर सह्र्या केल्या व शिक्के उमटवले. तिनही वेळेस हीच प्रक्रिया झाली होती. नि. क्र. ३७ व ३८ आता मला दाखवले. त्यावर नोटरी यांच्या सह्र्या नाहीत तसेच शिक्केही नाहीत. हे खोटे आहे की, हे तिनही करारनामे मी न वाचता व त्यावर कोणाच्याही सह्र्या नसतांना मी त्यावर सह्र्या केल्या.

७. प्रतिवादी यांच्याकडे एकुण किती शेती आहे हे मला माहित नाही. परंतु सौदा २

एकरबाबत झाला होता. विक्रीसाठी स्टॅम्प ड्युटी अमाउंट बद्दल मला माहित नाही व त्याबाबत माझ्या समक्ष काही ठरले नव्हते. २ एकरची विक्रीपत्र करायचे ठरले होते. हे खोटे आहे की, सब रजिस्ट्रार कार्यालयात मी हजर नव्हतो. हे खोटे आहे की, मला या व्यवहाराबाबत काही माहित नाही आणि मी वादींच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे. हे खोटे आहे की, वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये जमिनीबाबत कुठलाही व्यवहार झालेला नाही आणि वादींनी प्रतिवादीला कुठलीही रक्कम दिलेली नाही.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

समक्ष,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड
दि. ०९.१२.२०२५

श्रवणोत्तर स्विकृती,

(एस. जी. लांडगे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
उमरेड